श्री व्यंकटेश महाविद्यालयास नॅकचा 'अ' मूल्यांकन दर्जा प्राप्त

"नॅक मूल्यांकनाची प्रक्रिया ही संस्था आणि महाविद्यालय या दोन्हींना सतत प्रगती करण्याची प्रेरणा देत असते. महाविद्यालयातील भौतिक सुख - सुविधा तसेच अध्ययन व अध्यापन कार्याचा दर्जा उंचावण्यासाठी नॅक मुल्यांकन उपयोगी ठरते. नवीन शैक्षणिक धोरणातील बदल स्वीकारून नवीन आव्हानांना तोंड देण्यासाठी महाविद्यालये सतत प्रयत्नशील आहेत. त्यामध्ये नॅक मूल्यांकन हा घटक प्रभावी ठरणार असून महाविद्यालयाने देखील होणाऱ्या नवीन बदलाला सामोरे जात गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे." असे प्रतिपादन ना.बा. एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्रीकृष्ण बोहरा यांनी केले. ते पुनर्मुल्यांकनासाठी बेंगलोर येथील समितीने भेट दिल्यानंतर मानांकन प्राप्त अभिनंदन कार्यक्रमाप्रसंगी  बोलत होते. श्री व्यंकटेश महाविद्यालयास दिनांक 29 व 30 सप्टेंबर 2023 रोजी बेंगलोर येथील नॅक या संस्थेकडून चौथ्या सायकलमधील महाविद्यालयाच्या पुनर्मुल्यांकनासाठी भेट दिली. या समितीमध्ये चेअरमन म्हणून श्री श्री विद्यापीठ , ओरिसाचे कुलगुरू डॉ. अजय कुमार सिंग, नॅक को-ऑर्डिनेटर मेंबर म्हणून काश्मीर विद्यापीठाचे माजी प्रोफेसर डॉ. मोहम्मद शफी सोफी व प्राचार्य मेंबर म्हणून एच. के. कॉमर्स कॉलेज , गुजरातचे प्राचार्य डॉ. अश्विन कुमार जनकराय दवे हे होते. यावेळी समितीने महाविद्यालयातील विविध भौतिक सुख - सुविधा तसेच विविध कागदपत्रांची कसून तपासणी केली. 2017 च्या नॅकच्या तिसऱ्या सायकल नंतर महाविद्यालयाने मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए.  माने यांचे व्हिजन व संस्थेचे अध्यक्ष श्री .श्रीनिवासजी बोहरा, चेअरमन श्रीकृष्ण बोहरा यांचे प्रत्येक स्तरावरील सहकार्य यामधून महाविद्यालयाचा कायापालट झाला. महाविद्यालयाच्या भौतिक सुख - सुविधांमध्ये पाच वर्षात प्रचंड वाढ झाली. यामध्ये महाविद्यालयांमध्ये लिफ्ट बसवण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांसाठी पाच हजार चारशे स्क्वेअर फुटाची प्रशस्त लायब्ररी बनवण्यात आली. शंभर संगणकाची अद्ययावत लॅब तयार केली असून वाढीव अभ्यासक्रमासाठी नवीन वर्ग खोल्यांचे बांधकाम करण्यात आले आहे.  जिमखाण्यासाठी जिमचे साहित्य, सांस्कृतिक हॉल, योगा सेंटर अशा विविध सुख - सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. तसेच महाविद्यालयांमध्ये विविध प्रकारची व्याख्याने घेऊन मुलांना मार्गदर्शन करण्यात येते. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेसाठी चर्चासत्रे सी.ए. परीक्षेची तयारी, युवा महोत्सवांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग, क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांचे यश अशा अनेक गोष्टींमधील गुणात्मक वाढीमुळे महाविद्यालयास

नॅकचे 'अ' मानांकन प्राप्त झाले. नॅक को-ऑर्डिनेटर डॉ. शुभांगी जरंडीकर यांनी मागील पाच वर्षात नॅकच्या दृष्टिकोनातून तसेच महाविद्यालयाच्या विकासासाठी मा. प्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक बाबींवर प्रचंड मेहनत घेतली. त्यांना महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पूर्ण सहकार्य केले. त्यामधूनच महाविद्यालय या यशापर्यंत पोहोचू शकले. यामध्ये ना.बा. एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाखांचे बहुमोल सहकार्य लाभले. संस्थेचे सर्व पदाधिकारी, सर्व शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक तसेच समाजातील विविध घटकांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

प्राचार्यांची बाईट

' महाविद्यालयास नॅकचे 'अ ' मानांकन प्राप्त झाल्याने समाधानी"

" महाविद्यालयात प्राचार्य पदावर रुजू झाल्यापासून महाविद्यालयास नॅकचे चांगले मानांकन मिळावे म्हणून मागील पाच वर्षांमध्ये अथक प्रयत्न केले असून संस्थेचे अध्यक्ष श्री.श्रीनिवासजी बोहरा व चेअरमन श्रीकृष्ण बोहरा, संस्था व संस्थेच्या सर्व शाखा तसेच नॅक को-ऑर्डिनेटर डॉ. शुभांगी जरंडीकर व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याचे हे फलित आहे असे मी मानतो.

-प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने

